


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६८ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०१ वैशाख शके १९४८, मंगळवार दि.२१ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## ट्रम्पची हुकुमशाही मोडून काढण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजकीय विचारसरणीला, ज्याला अनेकदा ट्रम्पवाद म्हटले जाते, त्यामध्ये हुकूमशाही प्रवृत्ती असल्याचे आणि ती लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत अनेक राजकीय विश्लेषक, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांकडून व्यक्त केले जाते. ट्रम्प प्रशासनाचे वर्तन, संस्थांवरील हल्ले आणि मेक अमेरिका ग्रेट अगेन () चळवळीची वाढती ताकद यावर चिंता व्यक्त केली जात आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प ज्या पद्धतीने अमेरिकेत व आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय घेत आहे तो निर्णय घातक ठरत आहे. लोकशाहीची मूल्य, लोकशाही सिद्धांत यांना न जुमानता ट्रम्प तानाशाही पद्धतीने निर्णय घेत आहे.

अमेरिकेत ट्रम्प विरोधात लोक रस्त्यावर उतरले असून ट्रम्प यांच्या धोरणांना विरोध करत आहे.

त्यांच्या धोरणांविरुद्ध, जसे की सामूहिक हद्दपारी आणि कुटुंबांची ताटातूट, मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ, जो २० जानेवारी २०२५ रोजी सुरू झाला त्यादरम्यान त्यांची राजवट अधिकारशाही आणि निरंकुशतेकडे झुकणारी असल्याचे टीकाकार आणि राजकीय विश्लेषकांनी वर्णन केले आहे. त्यांच्यावर संस्थात्मक नियंत्रणे कमकुवत करणे, निष्ठावंतांची नियुक्ती करणे, स्वतंत्र माध्यमांवर हल्ला करणे आणि मतभेद दडपून टाकणे असे आरोप आहेत. ट्रम्प यांनी महानिरीक्षकांसह (इन्स्पेक्टर्स जनरल) सरकारी अधिकाऱ्यांना बडतर्फ केले आहे आणि त्यांच्या जागी निष्ठावंतांची नियुक्ती केली आहे.

द अटलांटिक आणि द गार्डियन यांसारख्या प्रमुख स्रोतांनी त्यांच्या प्रशासनाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. नॉर्दर्न आयर्लंड लीगल क्वार्टरलीने अधोरेखित केल्याप्रमाणे, ते न्यायपालिका आणि स्वतंत्र प्रसारमाध्यमे यांसारख्या लोकशाही संस्थांना कमजोर करत आहेत, असे त्यांनी नमूद केले आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्याचा सन्मान न करता न जुमानता मनमानी पद्धतीने निर्णय घेत आहे. लष्करी शक्तीच्या आधारे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रात हस्तक्षेप करणे, तेथील सरकार उलथून लावणे, एखाद्या स्वतंत्र सार्वभौम देशाच्या भूभागावर दावा करणे व युद्धाला चालना देणे अशे गंभीर प्रकार ट्रम्प करत असल्याने जागतिक समुदाय मेटाकुटीस आला आहे.

सेंटर फॉर अमेरिकन प्रोग्रेसच्या मते, त्यांच्या प्रशासनावर जागतिक स्तरावर हुकूमशाहीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप आहे.

ट्रम्प प्रशासनाने आपली सत्ता मजबूत करण्यासाठी अशा परदेशी नेत्यांशी घनिष्ठ संबंध निर्माण केले, जे विरोध दडपतात, मानवाधिकारांचे उल्लंघन करतात आणि नागरी स्वातंत्र्यावर निर्बंध घालतात. ट्रम्प प्रशासनाने परराष्ट्र धोरणात लोकशाही आणि मानवाधिकारांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम (जसे की ) बंद केले, ज्यामुळे नकळतपणे हुकूमशाही शासकांना हिरवा कंदील मिळाला.

आंतरराष्ट्रीय सहकार्यातून माघार घेत करत मोडले. ट्रम्प प्रशासनावर जागतिक मित्र राष्ट्रांशी संबंध कमकुवत केल्याचा आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमधून माघार घेतल्याचा आरोप आहे, ज्यामुळे जागतिक नियम-आधारित व्यवस्था कमकुवत झाली.

व्यापार आक्रमकता दाखवून ट्रम्प यांनी आपली मनमानी जाहीर केली. चिनी व भारतीय आयातीवरील जड शुल्क आणि इतर देशांशी व्यापार युद्ध यांसारखी धोरणे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील स्थिरतेऐवजी वर्चस्वासाठीची स्पर्धा म्हणून पाहिली गेली.

संशोधकांचा असा विश्वास आहे की ट्रम्प यांनी अमेरिकेतील प्रेस आणि स्वतंत्र संस्थांवर केलेले हल्ले हे जगभरातील लोकशाही नियमांमध्ये हुकूमशाही शक्तींकडे होणाऱ्या बदलाचे संकेत देतात.

ह्युमन राइट्स वॉच यांसारख्या संघटनांचा असा निष्कर्ष आहे की, ट्रम्प प्रशासनाच्या ''अमेरिका फर्स्ट'' धोरणामुळे, नकळतपणे किंवा हेतुपुरस्सर, जगभरातील हुकूमशाही नेते अधिक मजबूत झाले आहेत, ज्यामुळे मानवाधिकार आणि लोकशाही स्वातंत्र्याला असलेला धोका वाढला आहे.

इराण अमेरिका युद्ध ट्रम्प यांच्या हुकूमशाहीचे द्योतक आहे. इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीवर हुकूमशाही प्रवृत्तीचे आरोप केले गेले आहेत, कारण त्यांनी अमेरिकन काँग्रेसला (संसदेला) बायपास करून थेट लष्करी कारवाईचे आदेश दिले होते. या संघर्षाचे विश्लेषण करताना काही प्रमुख बाबी समोर येतात:

ट्रम्प यांनी अंतर्गत इराणवर थेट आणि अचूक लष्करी हल्ले अधिकृत केले. या कृतींना अनेकदा ''अतिरेकी'' किंवा ''युद्धखोर'' मानले गेले, ज्यामध्ये इराणला पूर्णपणे नष्ट करण्याची भाषा केली गेली।

काँग्रेसला बगल देण्याचा आरोप: युद्धाची घोषणा करण्याचा अधिकार अमेरिकेच्या संविधानानुसार काँग्रेसला (संसदेला) आहे, परंतु ट्रम्प प्रशासनाने अनेकदा या प्रक्रियेला बगल देऊन निर्णय घेतल्याचा आरोप विरोधकांनी आणि काही अमेरिकी खासदारांनी केला, जो हुकूमशाही प्रवृत्तीकडे निर्देश करतो.

ट्रम्प यांच्या भाषणांमध्ये आणि रणनीतीमध्ये अनेकदा गोंधळ दिसून आला. इराणला ''अश्मयुगात धाडू'' अशी धमकी दिल्यानंतरही, नंतर कूटनीती आणि युद्धाचे दोन्ही पर्याय खुले ठेवले गेले. विश्लेषकांचे असे म्हणणे आहे की ही कारवाई लोकशाही स्थापन करण्यापेक्षा इराणच्या आण्विक क्षमतेला आणि जागतिक प्रभावाला नष्ट करण्याच्या आणि अमेरिकेचे हितसंबंध (उदा. तेलाचे राजकारण) साधण्याच्या उद्देशाने होती

ट्रम्प यांच्या इराणविरोधी मोहिमेत अनेक युरोपीय आणि इतर मित्रराष्ट्रांनी साथ न दिल्याने, ही कारवाई अमेरिकेच्या एकतर्फी आणि हुकूमशाही वृत्तीचे प्रदर्शन मानली गेली. ट्रम्प यांचा इराणवरील दृष्टिकोन हा लष्करी ताकदीचा अतिवापर आणि आंतरराष्ट्रीय नियमांपेक्षा स्वतःच्या निर्णयाला प्राधान्य देणारा असल्याने, तो अनेकांना हुकूमशाहीचा () वाटतो, तर त्यांच्या समर्थकांसाठी तो '' '' (शक्तीद्वारे शांतता) या धोरणाचा भाग आहे. थोडक्यात, डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर त्यांचे टीकाकार आणि राजकीय विश्लेषक अनेकदा हुकूमशाही प्रवृत्तीचे आरोप करतात, ज्यात कायद्याचे राज्य कमकुवत करणे, लोकशाही संस्थांना आव्हान देणे आणि विरोधकांना लक्ष्य करणे यांचा समावेश आहे. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात (जानेवारी २०२५ पासून), त्यांच्या निर्णयांना ''लोकशाहीचा अंत'' आणि ''हुकूमशाहीकडे वाटचाल'' म्हणून पाहिले जात आहे. जानेवारी २०२६ मध्ये, ट्रम्प यांनी स्वतःला ''हुकूमशहा'' म्हटले, पण त्याचबरोबर असा दावाही केला की त्यांचे राज्य ''सामान्य ज्ञानावर'' आधारित आहे आणि केवळ ''त्यांची स्वतःची नैतिकता''च त्यांना मर्यादित करू शकते.ट्रम्पची हुकूमशाही प्रवृत्ती अमेरिकेतील लोकशाहीसाठी एक मोठे आव्हान आहे आणि ती मोडून काढण्यासाठी संस्थात्मक, राजकीय आणि सामाजिक पातळीवर एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली आहेत, जी लोकशाही वाचवण्यासाठी महत्त्वाची आहेत.

## गिरीश वसेकर यांच्या ''पापा''ला बालकुमार साहित्य संस्थेचा पुरस्कार जाहीर

### २५ एप्रिलला होणार पुण्यात वितरण


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणे - अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या पुरस्कारांची घोषणा नुकतीच झाली. या पुरस्कारांचे वितरण शनिवारी (ता. २५) सकाळी १० वाजता महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीत होणाऱ्या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते होणार आहेत, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजन लाखे, निवड समिती सदस्य कविता मेहेंदळे आणि मृणाल जैन यांनी दिली.

यंदाच्या पुरस्कारांसाठी श्रीपाद ब्रह्मे (फुलपाखरू), स्मिता बनकर (बिट्टोची खिडकी), आश्लेषा महाजन (गप्पी गप्पा आणि इतर कथा), श्रुती वडगबाळकर (गोष्ट छबिची), जनार्दन देवरे (सरदार भगतसिंह), डॉ. लता पाडेकर (खजिना नाट्य छटांचा), डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी (खगोलशास्त्रातील जयंत तारा), म.सा.प. मावळ शाखा (परीघ दिवाळी अंक), प्रा. साईनाथ पाचारणे (बालसाहित्याची मीमांसा), प्रा. माधव धायगुडे (चिंतन सत्कृत्याचे), मेधा इनामदार (रोज एक गोष्ट), गिरीश वसेकर (पापा), डॉ. नंदा हरम (विज्ञानाची गाणी), कविता झुंझारराव (आता जाऊ सूर्यावर), बा. स. जठार (बाप्पा माझे ऐका) यांची निवड झाली आहे.

आणि विशेष म्हणजे गिरीश वसेकरांचे हे पहिलेच पुस्तक आहे. पापा (पालक व पाल्यांसाठी) हे विद्यार्थ्यांसाठी पण पालकांसाठी छान मार्गदर्शन करणारे पुस्तक आहे. पहिल्याच पुस्तकाला पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. ज्योतिर्मय प्रकाशन तर्फे प्रकाशनाची सुरुवात याच पुस्तकापासून दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध बाल साहित्यिक, दिग्दर्शक, लेखक, कवी, गितकार श्री दासू वैद्य यांच्या शुभहस्ते पुण्यात झाली होती.

त्यांच्या पुढील लेखन प्रवासास ज्योतिर्मय प्रकाशन तर्फे खूपखूप शुभेच्छा.




## कला कलावंताच्या रक्तात भिनलेली असते - नगराध्यक्षा मोहीनी नाईक

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुसद - कला ही दैवीशक्ती आहे, परिश्रमाने ती अधिक ठसठसीत होत असते. कोणतेही कला त्या कलावंताच्या रक्तात भिनलेली असते व परिश्रमाने ती ठसठसीत होते. ती उजागर करण्यासाठी व्यासपीठ किवा संधी प्राप्त व्हावी लागते. आरतीताई ग्यानचंदाणी यांच्या कुंचल्यात, बोटामध्ये किमया आहे. त्यातून हे सारे चित्र कृती साकार झाली आहे. असे उद्गार मोहीनी नाईक यांनी उद्घाटन प्रसंगी काढले. या वेळी कवीवर्य दीपक आसेगांवकर यांनी आरती ग्यानचंदाणी यांच्या कलाकृतीचे कौतुक केले. चित्रातही स्वच्छता असते हे मला सारे



चित्र पाहून जाणवले. नगराध्यक्षा मोहीनी यांनी सुद्धा पुसद स्वच्छ समृद्ध करावे असे मत प्रदर्शित केले. आरती ग्यानचंदाणी यांना या छंद कलेविषयी विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी तशी विज्ञानाची शिक्षिका पण बालपणा पासून चित्रकलेची आवड होती. यातील बरेचसे चित्र कोवीड काळात साकारली आहेत. पती रवी यांनी माझ्या कलेला प्रोत्साहन दिले. या सर्व चित्रांमध्ये विषयांची विविधता व चित्रांचा वेगवेगळा प्रकार आहे. प्रामुख्याने वारलीचित्र, निसर्ग व व्यक्तिचित्र मोठ्या प्रमाणात आहेत असे सौ आरती ग्यानचंदाणी यांनी सांगीतले. जवळपास १०० चित्रांची प्रदर्शनी पुसदकरांच्या डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली. प्रदर्शनी पाहण्यासाठी विद्यार्थी महिला व कला प्रेमिनी हजेरी लावली. चित्र पाहतांना एकादया मोठ्या महानगरातील कला प्रदर्शनी पाहण्याचा भास कला प्रेमींना होत होता. उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर कवीवर्य, कृषीभूषण दिपक आसेगांवकर, ॲड. आशीष भाऊ देशमुख, डॉ सतिश चिद्दरवार, शरद मैंद, डॉ संजय जाधव, सुरज डुबेवार, अश्विनी जिल्हेवार, व श्रीमती अनघा चक्करवार आदी विराजमान होते. या कार्यक्रमास अमर आसेगावकर, ॲड. विश्वास भवरे, प्रा रमेश वाघमारे, दीपक परिहार , विष्णू धुळे, मारोती भस्मे यांच्या सह अनेक कलाप्रेमी उपस्थित होते.

## गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

''तुझे नाव विनायक, गजवदना तू मंगलदायक,

सकलविघ्ने कलिमलदाहक, नामस्मरणे भस्म होती.

चतुर्थी ही हिंदू देवता गणेशाच्या पूजेशी संबंधित आहे. या दिवशी विघ्नहर्ता गणेशाची पूजा केली जाते. शहाणपण, समृद्धी आणि सौभाग्य याचे प्रतीक असणाऱ्या हत्तीच्या डोक्याची देवता भगवान गणेशाला समर्पित हा आजचा दिवस. विनायक चतुर्थी व्रत उपवास केल्याने श्री गणेश आपली दुःखे दूर करतात.जीवनात मंगलमयता आणून मनोकामना पूर्ण करतात. भगवान गणेशाच्या आशीर्वाद घेण्यासाठी हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो.


आपल्या हिंदू धर्मात गणेशाची पूजा केल्यानंतरच इतर पूजेचे पूर्ण फळ मिळते, हे आपण जाणतोच. हे व्रत केल्याने तुमच्या जीवनातील अडचणी दूर होतात आणि प्रत्येक क्षेत्रात तुम्हाला हमखास यश मिळते. या दिवशी गणपतीच्या बारा नावाचा जप, मंत्र आणि स्तोत्राचे पठण करावे. गणपतीच्या १०८ नावाचा जप करावा. हा जप करणे खूपच लाभदायक ठरते. या व्रताच्या पुण्याईने भक्ताची सर्व कामे सिद्धीस जातात.

या दिवशी काय करावे : सकाळी लवकर उठून स्नान करावे. गणेश पूजनाचा संकल्प करावा. मनोभावे देवाची पूजा करावी. विनायक चतुर्थीला गणेशाला हळद अर्पण करावी. गणेशाच्या आवडते खाद्य हे मोदक असल्याने प्रसाद म्हणून मोदक अर्पण करावा. आरती करून प्रसाद वाटप करावा.

गणपती बाप्पा हे सर्वांच्या आराध्य दैवत आहेत. गणपती बुद्धीची देवता आहे. गणपती ही प्रेरणा देणारी वैश्विक देवता आहे. विविध कलांच्या माध्यमातून सर्वांशी मनमोकळा संवाद साधणारे आणि सर्वांच्या जवळचे हे दैवत आहे. हे पराक्रमी असले तरी रागीट नाही. तेजस्वी असले तरी तापहीन असे दैवत आहे. गणपतीची शाश्वत भक्ती प्राप्त होण्यासाठी, कृपाप्रसाद मिळण्यासाठी प्रत्येक महिन्यातील शुद्ध चतुर्थी तिथीला विनायकी चतुर्थीचे व्रत केले जाते. गणपतीला दूर्वा अर्पण करणे अत्यंत शुभ मानले



जाते. या दिवशी गणपतीला २१ दुर्वांची जोडी अर्पण केल्याने बाप्पा प्रसन्न होतात. भक्तांना सुख समृद्धी देऊन बुद्धि प्रदान करतात.




वैशाख चतुर्थी महात्म्य : वशिष्ठ मुनी राजा दशरथाला वैशाख शुक्ल चतुर्थीचे महात्म्य सांगताना म्हणाले की, फार पूर्वी गुर्जर प्रांतातील भद्रक नावाच्या नगरीत ब्रह्मप्रिय नावाचा राजा राज्य करीत होता. राजा हा अत्यंत पराक्रमी असूनही धर्मपरायण व दानप्रिय राजा म्हणून प्रसिद्ध होता. राज्यातील प्रजाजनांना राजा विषयी अत्यंत प्रेम आदर होता. जनमानसात लोकप्रिय असलेला हा पराक्रमी राजा मात्र मनातून फार दुःखी होता. त्याला कारणही तसेच होते. त्याच्या पहिल्या पत्नीचे निधन झाल्यानंतर राजाने दुसरे लग्न केले. राजाने दुसरा विवाह केला पण त्याही पत्नीचे निधन झाले. असे एक, दोन नाही राजाचा पाच वेळा विवाह झाला पण दुर्दैवाने त्याच्या सर्व पत्निंचे निधन झाले. राजाची मनस्थिती खालावली. आपल्या भोवताली वेदनांचा सागर आहे असे राजाला वाटू लागले. अत्यंत दुःखी होऊन राजाने आपल्या प्रधानावर राज्य सोपवून वनातील आपल्या गुरुकडे निघून गेला.

अरण्यात ब्रह्मप्रिय राजाची महायोगी महात्मा श्वेतकेतू यांची भेट झाली. श्वेतकेतू यांनी राजाला क्षेमकुशल विचारले आणि राजन इकडे येण्याचे काय प्रयोजन आहे असाही प्रश्न त्यांनी राजाला विचारला. राजाने जे जे काही घडले ते त्यांना सविस्तर सांगितले आणि मुनींना विनंती केली की, माझ्या दुःखाचे निवारण करावे. राजाचे बोल ऐकताच सद्गुरु श्वेतकेतू यांनी ध्यान लावले. काय झाले असेल? याचे कारण शोधले. त्यावेळी ध्यान करताना जे काही सद्गुरूंना आठवले किंवा दिसले ते राजाला सांगताना म्हणाले, राजा तुझ्या राज्यातील चतुर्थी व्रत संपुष्टात आलेले आहे. त्या व्रताच्या परिणामामुळेच तुला असे फळ भोगावे लागत आहे. राजन लवकरच तू नरकात जाशील.

सद्गुरुचे असे बोलणे ऐकून राजा ब्रह्मप्रिय त्यांना शरण गेला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून मला यातून बाहेर काढा अशी त्यांना विनंती केली. मुनीवर आपण मला गणेशाच्या स्वरूपाची व व्रताची माहिती सांगा. त्यावेळेस सद्गुरु श्वेतकेतुने श्री गणेश कसे आहेत? कोण आहेत ? व त्यांच्या चतुर्थी व्रताची माहिती सांगितली. राजाला म्हणाले राजन, गणेशाचे स्वरूप लक्षात घेऊन त्याचे भजन, पूजन करीत जा.असे सांगताना त्यांनी आपला पूर्वीच्या वृत्तांत राजाला सांगायला सुरुवात केली. राजन माझे वडील उद्यालक यांना नमस्कार करून व त्यांचे आज्ञा घेऊन मी वनात तपश्चर्या करण्यासाठी निघून गेलो. रानात मी घोर तप केले त्या तपाच्या तेजाने त्यांनी मला मोठ्या प्रेमाने उपदेश केला. मुला शांती लाभासाठी करीत असलेला जप सोडून मीच ब्रह्म आहे हे मनाला सांग. मी कोण? कोठून आलो याचे ज्ञान प्राप्त करून घे असे सांगितले. त्यानंतर उद्यालकाने आपल्या पुत्रास शांती योगात्मक ज्ञान दिले व मला एकाक्षर मंत्र दिला. वडीलाने सांगितल्याप्रमाणे मी मंत्राच्या अनुष्ठान केले. त्या अनुष्ठानाने माझ्यावर गणेशाची कृपा झाली व शांतीयोग प्राप्त झाला. वृत्तांत झाल्यानंतर सद्गुरु श्वेतकेतूनी ब्रह्मप्रिय राजाला गणेशाची ३२ अक्षराचा मंत्र दिला,

''वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ ।

निर्भिघ्नं कुरुमे देवं सर्व कार्येषु सर्वदा ।।

व या मंत्राचे अनुष्ठान करण्यास सांगितले. राजा ब्रह्मप्रिय यांनी श्वेतकेतूला नमस्कार केला व आपल्या राज्यात परत आला. सद्गुरु श्वेतकेतू यांनी सांगितल्याप्रमाणे राजांनी निष्ठेने व मनापासून व्रत केले व सर्व प्रजाजनांनाही करावयास सांगितले. या व्रताच्या बलाने राजाला गणेशाची कृपा प्राप्त झाली. राजाचे परत एकदा लग्न झाले. गणेशाच्या कृपेने आणि व्रताच्या बलाने त्याला पुत्रही झाला. दोघे दीर्घायुष्य झाले. काही काळानंतर आपल्या पुत्रास राज्य सोपवून ब्रम्हप्रिय गणेश भक्तीत रममाण झाले व आपले नाव ब्रह्मप्रिय हे सार्थक केले.

''गौरीपुत्रा तू गणपती, परिसावी सेवकाची विनंती,

मी तुमचा चरणार्थी, रक्षिणे सर्वांथेची स्वामीया'' गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया



## जात्यावरच्या ओव्या......

भाऊ बसला बैठकी
नही उसंत बोलाया
वैनी बसली रुसुन
कस सांगु भाऊराया ||६०३||

भाऊ भांग पाडतो
वैनी आरसा धरती
भाऊ भोळा महादेव
त्याच्या संग पारबती ||६०४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २१

**ज्योतिर्मय साहित्य**

संत तुकाराम महाराजांना संतसंग आणि भगवद्भक्तीची आस होती. ते म्हणतात –

न लगे मुक्ती आणि संपदा, संतसंग देई सदा।
तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी ।।

संतांचा, सज्जनांचा संग म्हणजे सहवास मिळावा, परमेश्वराची भक्ती कायम लाभावी म्हणजे जेणेकरून त्यातील गोडी कायम अनुभवता येईल. म्हणून त्यांना गर्भवास म्हणजे पुन्हा जन्म घेणेदेखील मान्य आहे.





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

तुकाराम महाराजांसारख्या संतांची ही सद्वासना झाली. परंतु या ऐहिक जीवनात सामान्य मनुष्य एवढा गुंतून जातो की त्याच्या अनेक प्रकारच्या वासनांची पूर्ती कधी होतच नाही. ज्याप्रमाणे अग्नीमध्ये जेवढे इंधन घालावे तेवढा तो अधिक प्रज्वलित होतो. तशा या दुर्वासना देखील वाढत जातात आणि अंतकाळी या वासना कायम असतील तर त्या पोटी मनुष्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो. सत्ता, संपत्ती आणि स्त्री संबंधित वासना कधी संपतच नाहीत. कामिनी आणि कांचन यांच्या वासना सर्वात जास्त प्रबळ आहेत. त्यांच्यावर मात करणे सोपे नाही. इतर वासना त्यामानाने गौण आहेत. आज जगातील घडणारे बहुतेक गुन्हे आणि वाईट घटना कामिनी आणि कांचनाच्या हव्यासापायीच घडत आहेत. चित्रपटातून आणि टीव्हीवरील विविध प्रकारच्या धारावाहिकांमधून अशाच घटना समोर येतात. त्यापासून बोध घेण्याऐवजी त्यातील वाईट गोष्टींचा प्रभाव समाजमनावर अधिक पडतो. भ्रष्टाचाराच्या घटनांबद्दल तर न बोललेले बरे इतक्या त्या नित्याच्या झाल्या आहेत.



वासना अपूर्ण राहिल्या की पुन्हा जन्म घ्यावा लागतो. जन्माला आल्यानंतर या वासनांचा भोग तर मिळतो परंतु माणसाची अधिकाधिक अधोगती होते आणि त्याने तो मुक्ती पासून दूर जातो.

परद्रव्य कांता पराची पाहता
स्मरादि रिपु ओढिती मानसाता

असे श्री दत्त स्तुतीत म्हटले आहे. दुसऱ्याचे धन, दुसऱ्याची स्त्री यांची अभिलाषा धरली तर काम, क्रोध यांसारखे शत्रू मनावर आक्रमण करतात आणि शेवटी ते माणसाचा नाश घडवून आणतात.

म्हणूनच जन्म मृत्यूचा फेरा म्हणजेच येरझारा चुकवायचा असेल तर समर्थ वासनेवर मात करायला सांगतात. आणि त्यासाठी ईश्वर प्राप्तीचे पवित्र ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवावे लागते. केवळ ध्येयवादी मनुष्य असा त्याग करू शकतो. माया मोहात अडकलेले मन आपण ईश्वराकडे लावले तर तेच मन आपल्याला ( राघवाची ) ईश्वराची भेट घडवून देईल.

स्वसंवाद : माझ्या आयुष्यात कोणत्या वासना मला सर्वाधिक बांधून ठेवतात?

कामिनी आणि कांचनाच्या मोहापासून दूर राहण्यासाठी मी सजग आहे का? संतसंग, सत्संग किंवा आध्यात्मिक चिंतनाला माझ्या जीवनात किती स्थान आहे? माझ्या जीवनाचे ध्येय केवळ भोग आहे की ईश्वरप्राप्ती? **(क्रमशः)**





## सुविचार - प्रकाश


प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230



साधी राहणी उच्च विचारसरणी
शिकवण आहे पूज्य बापूजींची
आचार विचार पोशाखा मधुनी
मनास सवय लावूया नीटनेटकेपणाची

ज्ञान विज्ञानाची सांगड घालूनी
अंधश्रद्धा भोंदूगिरी नष्ट करूनी
सत्यशोधकी प्रयोग करूनी
पहावे जगती दृष्टी बदलूनी

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

♦ब्रम्हांडाची उत्पत्ती कशी झाली? व कर्म गती कशास म्हणावे?

नासदीय सुक्तामध्ये याचे रहस्यमय वर्णन यमधर्म राजाने नचिकेताला केले आहे. थोडक्यात असे की, विश्व निर्माण होण्यापूर्वी अतिंद्रीय निर्द्वंद्व स्थिती होती. पण ती तम आसित होती. सर्व ठिकाणी अज्ञान व अंधकार पसरलेला होता. त्या तमाच्या पोटात एको वर्ण रूपात एक वर्ण म्हणजे एक पांढरा रंग असणारा प्रकाश होता. त्यामध्ये स्वधा शक्ती म्हणजे प्राण शक्ती होती, पण ती अवात श्वसन रूपात होती. किंचित फुरफुर ,स्फुरण पावत होती एवढेच. त्यामध्ये तेजतत्व ज्ञानमय प्रेममय आनंदमय अशा अवस्थेत होते. यालाच "अव्यय ब्रह्म" म्हणतात. पण ती कला त्रिगुण रहित होती.
संत तुकारामाच्या भाषेत "जाणीव नेणीव भगवंती" नाही अशा अवस्थेत स्थितीत होती. स्वसंवेद्य स्थितीत होती म्हणजे तमाच्या अंधाराच्या पोटात शुद्ध पांडुरंग म्हणजेच पांढरा प्रकाश होता. तेच विश्व पंढरीचे मूळ पीठ पंढरपूर आहे. ब्रह्म सनातन विठ्ठल हाच आहे. त्या परमात्म तत्वाला बहु व्हावेसे वाटले. म्हणजे पूर्वी एको हम म्हणजे मी एकटा आहे
क्रमशः.......



## लघु बोधकथा

♦ ओळख

खूप दिवसांपूर्वीची गोष्ट आहे, दहा मुलांची एकमेकांशी अतिशय चांगली मैत्री होती. ते सर्वजण एकत्र राहत होते व एकत्रच खात, पित व बहुतांश वेळ सोबतच राहत होते. एकदा त्यांनी सर्वांनी मिळून एकत्र प्रवासाचा बेत ठरविला. ठिकाणही ठरले, सगळेजण आपापल्या वेगाने प्रवास करत होते. कोणी वेगाने पुढे जात होता तर कोणी संथ गतीने पुढे जात होता. मागे-पुढे जात होते पण ठिकाण ठरलेले असल्याने सगळे जण मुक्कामी पोहोचले. सगळे तेथे पोहोचल्यावर तेव्हा त्यांनी विचार केला आपला ग्रुप तरी मोजून घ्यावा. न जाणो कोणी तरी मागे तर राहिला नसेल. एका मुलाने सगळ्यांना रांगेमध्ये उभे करून मोजण्यास सुरुवात केली. त्याने मोजले व म्हणाला,"आपण तर नऊच जण आहोत. मग दहावा जण कुठे गेला" दुसरा मुलगा म्हणाला थांब मी मोजतो. त्यानेही मोजले तर नऊच जण निघाले. सगळ्यांच्या चेह-यावर उदासी निर्माण झाली. कारण एकजण कुणीतरी त्यांच्यातून हरवला गेला होता व आता तो त्यांना कधीच भेटणार नव्हता. सगळे मलूल चेहरा करून शांतपणे बसून राहिले. त्यांना अन्नपाणी घेण्याचेही सुचेना इतक्यात तेथून एक महात्मा जात होते. त्याने या उदास बसलेल्या मुलांना पाहिले व त्यांना त्यांची दया आली. त्यांनी मुलांना उदासीचे कारण विचारले असता मुलांनी एकजण हरवला असल्याचे सांगितले. त्या महात्म्याला त्यांची अडचण समजली व ते म्हणाले, मी तुम्हाला तुमचा हरवलेला मित्र शोधून देतो. त्याने सर्वांना रांगेत उभे करून मोजले तेव्हा ते दहाजण होते. त्या मुलांना त्यांचा दहावा मित्र सापडला होता. त्यांनी त्या महात्म्याचे आभार मानले व दहावा मित्र कसा काय शोधला हे विचारले असता महात्मा म्हणाले," अरे मित्रांनो तुम्ही तुमच्यापासून कधी मोजायची सुरुवातच केली नाही. तुम्ही कायम दुस-यापासून मोजायची सुरुवात करत असल्याने तुम्हाला तुमचे अस्तित्वच कधी जाणवले नाही व यामुळे तुमचा एक मित्र म्हणजे तुम्ही स्वत:लाच मुकत गेलात. हा हिशेब तुमच्या लक्षात न आल्याने तुम्ही जगातला एक सर्वोच्च मित्र गमावित होता."
तात्पर्य : आपणही स्वत:ला विसरून दुस-याकडेच लक्ष देतो. याच कारणामुळे जग स्पष्ट दिसत नाही. प्रथमत: आपण स्वत:ला ओळखले पाहिजे मग जगाची आपोआपच ओळख होते.



## आरोग्य संजीवनी

## लेमन टी पिण्याचे आहेत अनेक आरोग्यदायी फायदे

**ज्योतिर्मय साहित्य**

कसा बनवायचा पर्फेक्ट लिंबाचा चहा

एका स्वच्छ पातेल्यात पाणी घेऊन त्याला उकळी आणा.

रंग येण्यासाठी यात चहापूड घाला. लक्षात ठेवा की चहापूड खूप कमी घालायची आहे.

याला एक उकळी आणून कपात गाळून घ्या.

या कपात वरून लिंबाच्या रसाचे काही थेंब टाका. (कोमट असताना)

चव वाढवण्यासाठी आपल्या आवडीनुसार यात आपण मध (कोमट असताना) आणि आलेही घालू शकता.

आपला लिंबाचा चहा तयार आहे.

लेमन टी पिण्याचे अनेक आरोग्यदाचे फायदे :

आपल्याला माहित आहेतच की लिंबाचा चहा चरबी कमी करण्यासाठी फायदेशीर असतो. पण कसा? लिंबू शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकते आणि मेटाबोलिजम वाढवण्यास मदत करते.



लिंबू हा विटामिन सीचा प्रमुख स्रोत

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

आहे. यामुळे शरीरातील पेशींची वाढ आणि विकास होण्याबरोबरच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही मदत होते. विटामिन सी लोहाची कमतरता रोखते आणि रक्तदाब व हृदयरोगाचा धोका कमी करते.

लिंबाच्या चहात आले घातल्यास हे पेय सूज रोखण्यासाठी उपयुक्त असते. आले हा मळमळ व अंगदुखीवरचा उत्तम उपाय आहे. याशिवाय वारंवार भूक लागण्याच्या तक्रारीवरही गुणकारी असते. आल्यातील उच्च फायबरमुळे शरीरातील ऊर्जा वाढते आणि पचनास मदत होते.

लिंबाचा चहा जास्त आरोग्यकारक बनवण्यासाठी यात साखर घालू नका. याऐवजी स्टीव्या वापरा. यातील नैसर्गिक गोडवा मेटाबोलिजम वाढवतो आणि चरबी कमी करतो.

आपल्या आवडीनुसार यात आपण चहा करताना कार्बनिक लेमनग्रास घालू शकता. यात अँटीऑक्सिडंट गुण असतात आणि हे त्वचा व केसांसाठी चांगले असते. यामुळे मासिक पाळीच्या वेदनांपासूनही आराम मिळतो.

# कृतीयुक्त-शिक्षण सभुच्या विद्यार्थ्यांचा अनोखा भाषा उपक्रम




**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत इयत्ता सातवी फ च्या विद्यार्थ्यांनी ऍक्टिव्हिटी-बेस्ड-लर्निंग उपक्रम आयोजित केला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी इंग्रजी व्याकरणातील नाम, सर्वनाम, क्रियापद, विशेषण (पार्टस ऑफ स्पीच) होमोफोन्स, वर्ड बिल्डिंग अशा विविध विषयांवर आधारित आकर्षक शैक्षणिक मॉडेल्स तयार करून सादर केली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, विषयावरील समज आणि सक्रिय सहभाग प्रभावीपणे दिसून आला. यामुळे अध्यापन प्रक्रिया अधिक रंजक व परिणामकारक ठरली.

या उपक्रमास श्री सरस्वती भुवन संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, सहसचिव डॉ. रश्मीताई बोरीकर, कोषाध्यक्ष श्री मिलिंद रानडे, मुख्याध्यापक श्री विश्वरूप निकुंभ, पर्यवेक्षक विजय चापाईतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स भु संस्थेचे पदाधिकारी, प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी या भाषा उपक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे व सर्जनशीलतेचे कौतुक केले.

या उपक्रमाचे आयोजन इंग्रजी विषयशिक्षिका शुभांगी पांगरकर यांनी केले.

# स्नेहदिप होमिओपॅथी अँड डायट क्लिनिकचे थाटात उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

छ.संभाजीनगर - काल अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावार शब्दगंध ५९ जयनगर या ठिकाणी डॉक्टर वृषाली पांडव यांच्या स्नेहादिप होमिओपॅथी व डायट क्लिनिकचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. व्हि.एस् पाराशर प्रोफेसर डी. के.एम.एम. कॉलेज छ.संभाजीनगर यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना डॉ.पाराशर यांनी होमीओपॅथीचे महत्त्व सर्वांना सांगितले. सर्वांना समजेल अशा भाषेत होमीओपॅथीची माहिती दिली. आपल्या आजारावर होमिओपॅथीच्या औषधाचा काय व कशा परिणाम होतो हेही त्यांनी विशद केले. होमिओपॅथिची औषधे शरीरातील आजाराचा समूळ उच्चाटन करतात हेही त्यांनी सांगितले. पूर्ण आजार बरा होण्यास थोडासा वेळ लागतो हे जरी खरे असले तरी ही उपचार पद्धती नक्कीच चांगली आहे. उपस्थित सर्व मान्यवरांना त्यांनी काल उद्घाटन झालेल्या क्लिनिक मध्ये येऊन आपल्याला काही आजार असेल तर डॉ. वृषाली पांडव यांना आपली तब्येत दाखवून आजारातून मुक्त व्हावे. डॉक्टर वृषालीच्या या क्लिनिकला आपण सर्वांनी चांगला प्रतिसाद द्यावा असे आवाहन त्यांनी केले.


या कार्याचे प्रास्ताविक डॉ.वृषाली पांडव यांनी केले तर प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचा



सत्कार नारायण पांडव व मुकुंद पांडव यांनी केला. सौ प्रतिभा पांडव यांनी आपल्या मनोगतातून सौ वृषालीला आशीर्वाद दिला आणि पुढच्या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुरलीधर टाकळीकर यांनी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. वृषालीला आशीर्वाद दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिरुद्ध पांडव यांनी तर, आभार प्रदर्शन नारायण पांडव यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी दीपक केतकर, स्नेहल केतकर, नीलिमा पांडव यांनी प्रयत्न केले. आजच्या कार्यक्रमासाठी जेष्ठ बाल साहित्यिक प्रशांत गौतम, विविध क्षेत्रातील मान्यवर, हितचिंतक उपस्थित होते.

# साडेतीन मुहूर्तांपैकी एक - अक्षय्य तृतीया




**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

या कृतीने मानवजातीला एक आध्यात्मिक संदेश दिला, की गरजू लोकांना अन्न देणे किती महत्त्वाचे आहे, कारण देव प्रत्येक जीवात वास करतो. म्हणूनच, या कथेनुसार, त्या शुभ दिवशी खुद्द देवीने भगवान शिवाला भोजन दिले.

श्रीकृष्णाचा बालमित्र सुदामा जेव्हा त्याला भेटायला गेला होता, तेव्हा कृष्णाने सुदाम्याचे दारिद्र्य दूर करून त्याला ऐश्वर्य दिले, तो दिवस अक्षय तृतीयेचाच होता.

या दिवशी सोने खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. असे केल्याने घरात लक्ष्मीचा कायमचा वास राहतो आणि समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे.या दिवशी खरेदी केलेली वस्तू, वास्तु चिरकाल राहते असे मानले जाते. तसेच या दिवशी केलेल्या दानाचे, पुण्याचे आणि शुभ कार्याचे फळ अनंत काळ टिकते असेही मानले जाते




म्हणुनच पाणी भरलेले मातीचे माठ, पंखे, छत्री, जव, सातू किंवा अन्नाचे दान केले जाते. उन्हाळा असल्याने गरजूंना शीतलता देणाऱ्या वस्तू दान करण्याला महत्त्व आहे.अनेक घरांमध्ये या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या नावाने पाण्याचा घडा आणि अन्नाचे दान केले जाते. तसेच या दिवशी प्रथम आंबा देवाला, पितरांना देऊन मगच आपण आंबे खाण्यास आरंभ केला जातो. या दिवशी बऱ्याच ठिकाणी आंब्याच्या सोबत पूर्ण जेवण म्हणजेच पुरणपोळीचा नैवेद्यसुद्धा देवाला आणि खास करून पितरांना देतात. पितरांना अन्न,पाणी देऊन या दिवशी तृप्त केले तर त्यांचे आशीर्वाद मिळतात असे मानतात.

करतात. सर्व प्रियजनांच्या सुदैव, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी पूजा आणि यज्ञ केले जातात. दानधर्म करणे हा देखील या दिवसाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि म्हणूनच गरीब व गरजू लोकांमध्ये अन्न, वस्त्र आणि इतर वस्तूंचे वाटप केले जाते. याच दिवशी चैत्र तृतीयेला आलेल्या माहेरवाशिण असलेल्या चैत्रागौरीला आंबेडाळ, कैरीचे थंडगार पन्हे, खरबूज, टरबूज, काकडी, खीर, लाडू, करंजी असे फराळाचे पदार्थ बनवून नैवेद्य करतात. सुवासिनींना हळदीकुंकू, चंदन, अत्तर लावून प्रसाद देतात आणि त्यांची भिजवलेल्या हरभऱ्याने ओटी भरतात. उन्हाळ्याची सुरुवात शीतल पदार्थांनी केल्यामुळे प्रसन्न वाटते. आणि या दिवशी खीर, दहिभात, कानवल्याचा नैवेद्य दाखवून चैत्रागौरीची पाठवणी केली जाते.

नवीन व्यवसाय सुरू करणे, गृहप्रवेश, लग्नकार्य किंवा मोठी गुंतवणूक करण्यासाठी हा दिवस सर्वोत्तम मानला जातो, कारण या दिवशी कोणत्याही पंचांग किंवा वेळ पाहण्याची गरज नसते; पूर्ण दिवसच शुभ असतो. सणाच्या निमित्ताने लोक आपली घरे स्वच्छ करून पहाटे उठून सडा रांगोळी घालून दाराला तोरणे,माळा लावतात. त्यामुळे घर, परिसर, वातावरण खुप प्रसन्न होते. सर्व प्रियजनांच्या सुदैव, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी पूजा आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी हा सण उत्साहात साजरा केला जातो.




**म्युच्युअल फंडाचा मोठा भाऊ**

आपण म्युच्युअल फंड म्हणजे काय ते समजून घेतले.पण आता एस आय एफ ( SIF ) स्पेशल इनव्हेस्टमेंट फंडस् येताहेत.
काय आहे हे नविन प्रकरण?
म्युच्युअल फंड कंपन्यांना त्यांच्या फंडाची रीस्क कमी करण्यासाठी डेरीव्हेटीव्हज मधे गुंतवणूक करण्याची मर्यादित परवानगी आहे.
मुख्यतः पोर्टफोलिओ हेज करण्यासाठी डेरीव्हेटीव्हज मधे पोझिशन घ्यायची मर्यादित परवानगी आहे,पण डेरीव्हेटीव्हज मधे नेकेड पोझिशन ची परवानगी नाही.
डेरीव्हेटीव्हज म्हणजे वायदे बाजार.या बाजारात प्रत्यक्ष शेअर्स ऐवजी त्यांचे वायदे ट्रेड केले जातात.
उदाहरणार्थ स्टेट बँक ऑफ इंडिया चा शेअर चांगल्या कामगिरीमुळे वाढणार येत्या महिन्याभरात २०टक्के वाढणार असेल तर त्या शेअरची खरेदी त्या वाढीव किमतीला आजच करायची .
अशा पोझिशनला लाँग म्हणतात.
तसेच या उलट एखाद्या शेअरची किंमत घसरणीवर आहे आणि तो १० ,१५ टक्के असणार आहे असा शेअर विकायचा.अर्थात तो आज महाग विकुन नंतर स्वस्त झाला की परत विकत घ्यायचा.या पोझिशन ला शॉर्ट म्हणतात.
म्युच्युअल फंडाच्या फंड मॅनेजर ला असे लाँग शॉर्ट करण्याची परवानगी नाही.
पण स्पेशल इनव्हेस्टमेंट फंडस् म्हणजेच एस आय एफ च्या फंड मॅनेजरला ही परवानगी आहे.
पुढील भाग उद्याच्या अंकात.......

# गौतमी पाटीलच्या दिलखेचक अदाकारीला रसिकांचा प्रतिसाद



**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - दिलखेचक अदाकारी, आकर्षक वेशभूषा, ठसकेबाज नृत्यशैली आणि रंगतदार सादरीकरणाच्या जोरावर प्रख्यात नृत्यांगना गौतमी पाटील हिने पिंपळे सौदागर वासियांची मने जिंकली. निमित्त होते ग्रामदैवत श्री मुंजोबा महाराज वार्षिक उत्सवाचे. उत्सवाच्या पहिल्या दिवशी शनिवार दि. १८ रोजी सायंकाळी गावजत्रेच्या मैदानावर या लोकप्रिय नृत्यांगनेच्या नृत्य मैफलीला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नृत्याव्दारे टाळ्या आणि शिट्ट्यांच्या गजरात '' ती आली, तिने पाहिले आणि तिने जिंकले '' या विधानाची प्रचिती उपस्थित प्रेक्षकांना देत गौतमीने उत्सवात बहार आणली.

उत्तरोत्तर रंगत गेलेल्या मैफलीचा प्रारंभ गणेश वंदनाने करण्यात आला. त्यानंतर गौतमी पाटील हिने ''मी साताऱ्याची गुलछडी'', मी मेनका'', ''झाल्या तिन्हीसांजा'', ''सोडा सोडा राया हा नादखुळा'' पाटलांचा बैलगाडा'' या आणि इतर विविध गाण्यांवर अप्रतिम नृत्य सादर केले. तिच्या प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट होत होता. विशेषतः तरुणाईने या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. दोन ते अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ पिंपळे सौदागर प्रभागाचे नगरसेवक विठ्ठल नाना काटे, मुंजोबा महाराज उत्सव कमिटीचे अध्यक्ष संतोष काटे, सांस्कृतिक कमिटीचे अध्यक्ष विजय भिसे, आखाडा कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब कुंजीर यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी युवा नेते उमेश काटे, सामाजिक कार्यकर्ते विजूशेठ काटे, मानसिंग काटे, कुंदन जाचक आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सालाबादप्रमाणे यंदाच्या या उत्सवाचा प्रारंभ पहाटे ग्रामदैवत श्री मुंजोबा महाराज मुर्तीच्या अभिषेकाने करण्यात आला. त्यानंतर गावातील मंदिरांच्या देवतांना पान - फुल अर्पण करण्यात आले. दुपारी विविध भजनी मंडळांनी भक्तीगीतांव्दारे मुंजोबा महाराज यांच्याप्रती सेवाभाव सादर केला. सायंकाळी निघालेल्या पालखी सोहळ्यात परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.




**सुख पाहता जवापाडे...**

मित्रांनो आणि वाचकहो, संत तुकारामाचा अभंग सर्वांनी ऐकला असेल. या संसारात व प्रपंचात "सुख पाहता जवापाडे, म्हणजे छोटे, कमी, पण दु:ख किंवा दगदग कष्ट पर्वताएवढे असतात.
आपण कुटुंब, नातलग आणि समाज बाहेर राहून काम करतो. एकमेकाशी संबंधात किंवा नात्यात मोडतोड करणं फार सोप किंवा त्याला फार मोठं ध्यान लागत नाही, परंतु तडजोड करायला शहाणपण व अनुभवही लागतो, आणि हेच सुखी संसाराच गमक .. पहा, पटतं का, अर्थात हे व्यक्ती परत्वे भिन्न असेल.
पायात काटा रुतला म्हणजे जगणं देण मुर्खपणाच आहे, कुणी चालणच बंद करत का? काटे म्हणजे अडचणी, संकटे त्यांना आव्हान देऊन मार्ग काढावा, हाताळावेत तर यश मिळते! असे कित्येक दाखले उदाहरणे आहेत. यशस्वी, मोठे धनवान, किंवा कलाकार, खेळाडू, डाक्टर, इंजिनिअर
हे काही सहज होतात का? नाही. त्यांनी त्यासाठी अपार मेहनत कष्ट जिद्द घेतलेली असते. नको असणार्या माणसाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यामुळे जगणं व हाताळणं सुसह्य होत. ताण कमी होतो, म्हणून जीवनात संसारात सुख सहज येत नाही, घडतही नाही तर ते जाणिवपूर्वक घडवाव लागतं त्यासाठी आपलं वागण, बोल आणि आपुलकी निर्माण करणं, आपल्या हातात आहे.
म्हणून तुम्हीच ठरवा कसं जगायचं ते.. ओ.के. गूड डे शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना..




स्थळ - शेतातील खळे वेळ - सायंकाळी चारच्या सुमारास
पात्र परिचय- वडील- बबन आप्पा वय -७५ धोतर, शर्ट, आणि फेटा, आई- हौसाबाई वय साधारण ७० काष्टा साडी, मुलगा - दिलीप वय - ५० पायजमा शर्ट खांद्यावर टॉवेल, सुनबाई - मंगल वय -४५ सहावार छापील साडी, नातू- संजय वय - २० पँट टी शर्ट, नातं - सुनिता वय - २३ कुर्ता पायजमा ओढणी.
शेतात लांब वर असलेला पांढराशुभ्र बैल, छोटी गायीची कालवड आणि गाय.
पडदा उघडल्या जातो रंगमंचावर - पाण्याची कळशी, तांब्या, टोपले, खुरपे, विळा, फावडे, कुदळ, ताडपत्री, तळवट, पोती, एका बाजूला ज्वारीच्या कणसाची रास कडबा पेंडी इत्यादी
(सोसायटीचे दोन तीन लाखाचे पीक कर्ज असलेले घर)
(पडदा उघडला जातो मागे स्क्रीन वर सुंदर शेतातील नजारा, आंब्याचे झाडं, त्यावर छान चिवचिवाटचे आनंददायी वातावरण आणि मधुर संगीत)

- आप्पा : सुने ये सुने मला वाईच तांब्याभर पाणी आणशील का ग ?
- सुनिता : हो आणते, आणते अप्पा (सुनिता आजोबांना पाणी नेऊन देते.)
- दिलीप : (कडब्याची पेंडी बांधत ) मंगल या वर्षी आपली मालदांडी आणि गट्टी दोन्ही चांगली आल्यात ग (मालदांडी आणि गट्टी ही ज्वारीची एक जात)
- मंगल : होय हो धनी, आता ह्या वर्षी तरी आपली सोसायटी कमी होईल आणि सुनीच्या लग्नासाठी पुढच्या वर्षी आपण पैसे साठवून ठेवायला येतील.
- संजय : ए आये ह्या वर्षी तरी मला मोन्यासारखी जीन्स पॅन्ट घ्यायची ग.
- मंगल : घे रे बाबा, तुला कसली पाहिजे तशी घे.
- हौसाबाई : संज्या ए संज्या, आर तिकडं काय करतुयास नुसता बोलतुयस, हिकडं य जरा ही कणस ह्या इळ्यान हलवी की वाईच. तिकडं खुशाल बसलायस.
- संजय : ए आजे बसू दे की वाईच, सकाळ पासन काटून काटून कटाळा आलाय, बसू दे की वाइच सावलीला.
- आप्पा : आर आर तिकडं तुझा बाप कडबा बांधतोय, त्याला वाईच मदत कर की, एखादा पाचूंदा बांधून झाला तर तेवढेच उरावरन खांद्यावर..!
- संजय : बर,बर करतो आजे तुझं पण काम करतो, आण आप्पा तुमच पण काम करतो, जातो कनस हलवायला.
- सुनिता : आर बस वाईच संज्या, मी हलवते कणस. आजे तू पण बस वाईच. मी हलवते कणस (सुनिता कणसे हलवत)
- हौसाबाई : मागं सरकून आज लईच तावतया नव्ह म्हातारबाबनू.
- आप्पा : व्हय व दिल्याची आई.
- दिलीप : कपिलेन खुरटून खुरटून गवांत खाल्ल्याया. मी आलो वाईच तिची खुट्टी बदलून इतक्या वर्षात तीच आपली आई झालीय.
- हौसाबाई : ये बाबा ये, तिच्या जीवावर तर सगळं चाललेय.

मंगल : आत्याबाई आव आत्याबाई मामांजींच धोतर आणलं व्हत ते कुठं दिसना झालं व्ह.

- हौसाबाई : मला नाही ठाव ग, आसल तिकडे कुपीत नाहीतर बुछाड्याकडे.
- दिलीप : ह्यावर्षी चांगलं खात घातलं होतं . धा पंधरा पोती तरी व्हतीलं नव्ह आप्पा.
- आप्पा : कसा उतार ( म्हणजे दरवर्षी कमी जास्त प्रमाण असते त्याला उतार म्हणतात.)हाय माहीत नाही. पण होतील असं मला वाटतं.
- आप्पा :- लै वर्षांनी अस पीक आलंया बघ चांगल वाटतया. सालोटा भागवून सोसायटीचा अर्धा निम्मा तरी बोजा कमी हुईल बघ दिल्या कितीवर गिलिया रं.
- दिलीप : दोन अडीच पावतर तरी आसन मला वाटते. (एवढ्यात संज्या)
- संज्या : (वडिलांना ) दादा, आव दादा तिकडं बेंदत मळणी मशीन आलं नव्ह.

उर्वरित उद्याच्या अंकात.....




**सौ. निर्मला भयवाळ**

*माझा परिचय अर्थात साहित्य क्षेत्रातील माझी वाटचाल*

*मी एक गृहिणी आहे, पती ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ यांच्यापासून प्रेरणा घेऊन मागील पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काळापासून कविता आणि ललितलेखन याद्वारे साहित्यसेवा. महाराष्ट्रातील पंधरा ते वीस विविध दर्जेदार दिवाळी अंकांमधून आणि नियतकालिकांमधून दरवर्षी लिखाण प्रसिद्ध होत असते. विविध साहित्यविषयक व्यासपीठांवरून तसेच आकाशवाणीच्या औरंगाबाद केंद्रावरून अनेकदा कवितावाचन केलेले आहे.*

- *२००८ साली "सारिपाट" हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला असून या संग्रहास 'अंकुर सार्वजनिक वाचनालय चांदूर, ता.जि. अकोला' यांचा "अंकुर साहित्य पुरस्कार – २००८" प्राप्त झालेला आहे.*
- *"स्टोरी मिरर" या ई-साहित्य संस्थेतर्फे २०२० साली आयोजित काव्यस्पर्धेत माझ्या कवितेला पुरस्कार प्राप्त झाला.*
- *"निसर्गायण" हा माझ्या निसर्गकवितांचा संग्रह २५ ऑक्टोबर २०२० रोजी विजयादशमीला प्रकाशित झालेला आहे.*
- *आठ मार्च २०२२ रोजी महिलादिनाच्या निमित्ताने औरंगाबाद येथील "योगीराज ज्योतिष अनुसंधान संस्था" या संस्थेच्या वतीने माझ्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन माझा सत्कार करण्यात आला.*

*****

*सौ. निर्मला भयवाळ*
*१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी*
*गादिया विहार रोड, शहानूरवाडी*
*छत्रपती संभाजीनगर ४३१००९*
*मो. ८८८८९२५४८८, ९८३४११९४४१*

*साहित्यिक मित्रांनो,*
*आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ*
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
*"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.*
*साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!*
*हो जाओ शुरु....*
*या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.*
*- संजय व्यापारी, संपादक 7743918559*
*ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ*



**ऑनलाईन औषधोपचार**



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षांचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# नोकरशाहीचा वेढा, न्यायालयाची ढाल

## एका शास्त्रज्ञाने 'मेक इन इंडिया' ला जीएसटी छळापासून कसे वाचवले

ज्योतिर्मय साहित्य

कोंकणाच्या धुक्यातील टेकड्यांमध्ये, जिथे अरबी समुद्र खडकाळ किनाऱ्याशी गुपिते कुजबुजतो, तिथे एक निश्चयी शास्त्रज्ञ डॉ. ओंकार प्रवीण हेरलेकर यांनी एक धाडसी निर्णय घेतला. लंडनच्या चकाचक प्रयोगशाळेतील आश्वासक करिअर मागे सोडून ते भारतात परतले. त्यांचे स्वप्न होते: भारताच्या भूमीवरच जीवनावश्यक औषधे तयार करणारा कारखाना उभारणे आणि देशाची परदेशांवर, विशेषतः चीनवर असलेले धोकादायक अवलंबित्व कमी करणे.




हे स्वप्न २००९ मध्ये लासा सुपरजेनरिक्स लिमिटेड या कंपनीच्या रूपाने साकार झाले. २०२५ पर्यंत ही कंपनी एक शक्तिशाली साम्राज्य बनली होती. ती अलबेंडाझोल सारख्या महत्त्वाच्या औषधांचे घाऊक उत्पादन करत होती, हे औषध घातक परजीवींशी लढते आणि असंख्य जीव वाचवते. दरमहा कारखान्याची उलाढाल जवळपास ₹२० कोटींची होती त्यातील निम्मी निर्यातीतून, जी भारतात मौल्यवान विदेशी चलन आणत होती, आणि निम्मी देशांतर्गत विक्रीतून, जी देशाच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देत होती. ६५० हून अधिक कुटुंबे या कारखान्याच्या धडधडीवर अवलंबून होती. ही 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' ची खरी प्रेरणा होती स्वावलंबनाचे जिवंत उदाहरण.

मग आपत्ती आली.

२५ मे २०२५ रोजी लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यात भीषण आग लागली. ज्वाळांनी यंत्रसामग्री भस्मसात केली आणि दुर्दैवाने मौल्यवान कागदपत्रेही नष्ट झाली. कंपनी हादरली. त्यानंतर कामगार अशांतता निर्माण झाली, पण व्यवस्थापनाने मनमोकळेपणाने त्याचे निराकरण केले ऑक्टोबर २०२५ मध्ये एकवेळीच निपटारा करून. डिजिटल रेकॉर्ड्स सुरक्षित होते आणि तातडीने सादर करण्यात आले. कंपनीला वाटले की सर्वात वाईट काळ संपला आहे.

ते चुकले.

राख अजून थंड होत असतानाच राज्य जीएसटी प्राधिकरणाचे अधिकारी वादळासारखे धावले. त्यांनी कारखान्याच्या जागेवर ताबा घेतला आणि "मूळ भौतिक दस्तऐवज उपलब्ध नसल्याने" असे कारण देत सुमारे ₹४ कोटींची मागणी नोटीस बजावली. केंद्रीय जीएसटीकडून ₹१०.८ कोटींची मागणी करण्यात आली होती पण अपलोडिंगमध्ये एक साधी क्लेरिकल चूक झाली आणि ती ₹१०८ कोटींच्या भयानक आकड्यात बदलली. ही दशांश बिंदूची चूक नंतर न्यायालयातही मान्य करण्यात आली.

या फुगवलेल्या आकड्यांच्या आधारे अधिकाऱ्यांनी भयावह वेगाने हालचाल केली. बँक खाती गोठवली, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) ला कडक निर्देश पाठवले आणि कारखान्याचे दरवाजे सील करून टाकले. उत्पादन थांबले. कुलूपबंद जागेत अमोनियम थायोसायनेट आणि हायड्रोजन सल्फाइड सारखी संवेदनशील रसायने अस्वस्थ शांततेत बसली होती पर्यावरणासाठी संभाव्य भीषण आपत्तीची वाट पाहत.

६५० हून अधिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांसाठी ही पूर्ण आपत्ती होती. पगार थांबले. शाळेची फी, लग्नकार्ये आणि रोजचे जेवण यांचे स्वप्न अडकले. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी याचा अर्थ होता जीएसटी महसूल गमावणे, निर्यात थांबणे आणि परदेशातून अधिक अलबेंडाझोल आयात करण्याची वेळ येणे ज्यापासून डॉ. हेर्लेकर यांनी इतके कष्टाने देशाला वाचवण्याचा प्रयत्न केला होता. स्वावलंबनाची भावना स्वतःच अतितांत्रिक नोकरशाहीच्या हातून धोक्यात आली होती, जी भौतिक वास्तव किंवा प्रामाणिक चुकांना महत्त्व देत नव्हती.

कंपनीने एकच मार्ग अवलंबला : न्यायालयीन लढाई

मार्च २०२६ मध्ये लासा सुपरजेनरिक्सने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच कडे धाव घेतली. ३० मार्च २०२६ रोजी माननीय न्यायमूर्ती माधव जे. जामदार आणि माननीय न्यायमूर्ती प्रवीण एस. पाटील यांच्या खंडपीठाने एक प्रभावी निकाल दिला, जो काळ्या ढगांमधून सूर्यकिरणासारखा वाटला.

न्यायालयाने मनमानी अपील आदेश रद्द केला, एमआयडीसीला पाठवलेले सर्व सक्तीचे पत्रे रद्द केले, ₹१०८ कोटींची हास्यास्पद मागणी ₹१०.८ कोटींवर योग्य ठिकाणी आणली आणि स्पष्ट केले की सीजीएसटी कायद्याची कलम १०७ ही मर्यादा कायद्याच्या भावनेने वाचली पाहिजे विशेषतः जेव्हा पक्ष सद्भावनेने वागतात. नैसर्गिक न्याय, प्रमाणबद्धता आणि सामान्य बुद्धीने विजय मिळवला.

कारखान्याचे दरवाजे उघडण्याचे आदेश देण्यात आले. नोकऱ्या वाचल्या. स्वप्नाला दुसरी संधी मिळाली.

पण विजयालाही कडवट चव होती.

उच्च न्यायालयाचा आदेश ३० मार्च २०२६ रोजीचा होता. कायद्याने त्याला ३१ मार्चपासून तात्काळ अमलात आणणे अपेक्षित होते. कंपनीने १ एप्रिलला उपायुक्तांना औपचारिक विनंती केली. दिवस ओढले गेले, पण शांतता होती. ८ एप्रिलपर्यंत काही हालचाल झाली नाही. ९ एप्रिलला आयुक्तांना कडक शब्दांत पत्र लिहिण्यात आले आदेश अमलात न आणल्यास न्यायालयाच्या अवमानना कारवाईचा इशारा देण्यात आला. मगच नोकरशाहीची चाके हळूहळू फिरू लागली.

न्यायालयाच्या जोरदार निकालानंतरही संघर्ष चालूच होता हे एक कठोर धडा होता की कागदावरील न्याय नेहमीच जमिनीवर तात्काळ दिलासा देत नाही.

तरीही आशा कायम होती.

ॲड. राजेंद्र आर. केडगे आणि ॲड. सुनील यादव यांच्या नेतृत्वाखालील कुशल कायदेविषयक टीमने (ॲड. उमंग यादव, हर्ष ए. के. आणि रोहिणी यादव यांच्या सहकार्याने) उत्कटतेने युक्तिवाद केला आणि एक ऐतिहासिक निकाल मिळवला. त्यांच्या वकिलीने केवळ एका कंपनीला वाचवले नाही तर देशभरात एक शक्तिशाली संदेश दिला : कर प्रशासनाने लोकांची सेवा करावी, त्यांना तांत्रिक बाबींखाली चिरडू नये. महसूल गोळा करणे हे नोकऱ्या, निर्यात आणि राष्ट्रीय स्वावलंबन यांच्या किंमतीवर होऊ नये.

आज, कोंकणाच्या टेकड्यांमध्ये लासा सुपरजेनरिक्सचे यंत्र हळूहळू पुन्हा गर्जना करू लागले आहेत. ही कथा एक क्लासिक भारतीय गोष्ट वाटते, एका दूरदर्शी माणसाची, ज्याने मोठे स्वप्न पाहिले, अप्रत्याशित आपत्तींची, चेहऱ्याविना नोकरशाहीची अतिरेकी कारवाई आणि शेवटी न्यायाची, जी वाकते पण मोडत नाही.

ही डॉ. ओंकार हेर्लेकर आणि त्यांच्या टीमची, ६५० कामगारांची ज्यांच्या कुटुंबांना पुन्हा श्वास घेता येईल, आणि त्या न्यायालयाची गोष्ट आहे ज्याने सर्वांना आठवण करून दिली: 'मेक इन इंडिया' च्या मार्गात मानवी घटक, उपजीविका, घाम आणि प्रामाणिक संघर्ष, कधीही विसरता कामा नये.

लासा सुपरजेनरिक्स आता अधिक सक्षमतेने उभी आहे, भारत आणि जगासाठी विश्व दर्जाची औषधे तयार करण्यासाठी अधिक निश्चयी आहे. राखेतून फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा उभारी घेण्यासाठी सज्ज आहे.

# प्रज्ञा उडाली आकाशी...

ज्योतिर्मय साहित्य



साधारण आठवडाभर घरात कुणीच नव्हतं. उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही मामाच्या गावाला गेलो होतो. मे महिन्याचा शेवटचा आठवडा होता आम्ही परत आलो कुलूप काढलं, स्वयंपाक घरात पाहतो तर काय! मुंग्यांची भलीमोठी रांग लागली होती. त्या रांगेची सुरुवात कुठं झाली आणि रांग संपलीय कुठं, याचा शोध घेण्यात आता मुलं रंगून गेली. कृष्णा पुढे पुढे जात होता आणि वैष्णवी त्याच्या मागे शांतपणे निरीक्षण करत होती.

"अगं आई, बघ ना या सगळ्या एकाच रस्त्याने चालतायत. कोणीतरी त्यांना सांगितलं असेल का?" वैष्णवीचा प्रश्न ऐकून मलाही हसू आलं.

मला मात्र प्रतिबंधात्मक उपाय करणं गरजेचं होतं कारण लाल मुंग्या होत्या त्या आणि मुलं बरीच लहान होती मुलांची सुरक्षितता, घरातली स्वच्छता या कारणांमुळे मला मुंग्यांना हाकलून लावणं गरजेचं होतं.




बराच खटाटोप करुन ती रांग बाहेर घालवण्यात मला यश आलं. या प्रयत्नात कितीतरी मुंग्या शहीदही झाल्या.

रांगेचं एक टोक मुलांना सापडलं होतं. रव्याचा डबा.

कृष्णानं विचारलं, प्रत्येक मुंगी रव्याचा एक कण घेऊन कुठं चाललीय गं आई? वैष्णवी पटकन म्हणाली, मुंग्या त्यांच्या घरी निघाल्यात. त्या वारुळात राहतात आणि खूप शिस्तीनं वागतात, तुझ्यासारखं नाही बेशिस्त वागत.

आता प्रकरण भांडणाकडे वळू नये, यासाठी मी दोघांच्यामध्ये पडले आणि म्हटलं, आता पावसाळा सुरू होईल. मग मुंग्यांना खाऊ मिळवण्यासाठी त्यांच्या घरातून बाहेर पडता येणार नाही म्हणून त्या आपलं अन्न आधीच साठवून ठेवतायत.

कृष्णाला आता काय काय प्रश्न पडले असतील, याचा अंदाज तुम्हाला आलाच असेल. अगदी मुंग्यांच्या घराला काय म्हणतात पासून मुंगी जगते किती दिवस इथपर्यंत असंख्य प्रश्न विचारून झाले. दोघांची ही गप्पांची मैफल बराचवेळ रंगली.

'माझ्या माहेरपणाच्या आनंदावर विरजण पाडलं मुंग्यांनी' असं एकच वाक्य माझ्या तोंडून गेलं, कृष्णानं ते ऐकलं आणि परत प्रश्नांचा रोखच बदलला. विरजण म्हणजे काय, ते मुंग्यांनी पाडलं कसं? विरजण पाडलं म्हणायचं की सांडलं? आनंद कुठं असतो, तो तर मनात असतो ना? मग तो मुंग्यांना कसा दिसतो? आपल्या आनंदावर विरजण सांडावंसं का वाटतं त्यांना?

माझा संयम संपला आणि मी एकदम चुकीचं वागले कृष्णाशी. मी ओरडले.

तो मुसमुसायला लागला. ते पाहून वैष्णवी त्याच्याजवळ गेली आणि म्हणाली,

"चल, आपण बाबांची वाट बघूया आईचा राग थोड्यावेळातच जाईल." बराचवेळ मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. मी रागातच होते. दोघंही माझ्या नजरेसमोर नको आहात मला, असंही ओरडले. मुलं हिरमुसली आणि बाबांची वाट बघू लागली

पण नेमके बाबा त्यारात्री बरेच उशिरा घरी आले. तेव्हा मुलं झोपली होती आणि सकाळी मुलं उठण्याआधीच ते ऑफिसला निघून गेले होते. एव्हाना मलाही माझ्या वागण्याचा पश्चात्ताप झाला होता. आता मुलं उठली की खूप लाड करायचे त्यांचे, म्हणतील तो खाऊ करायचा वगैरे इमले मी रचत होते.

मुलं उठली आणि दबकतच माझ्याजवळ आली. माझा बदललेला मूड बघून खुलली आणि परत आमचा गप्पांचा फड रंगला. लाल मुंग्या चावतात, काळ्या मुंग्या चावत नाहीत, म्हणून काळ्या मुंग्यांना देवाच्या मुंग्या असं आम्ही म्हणायचो, ही माहिती मी त्याला पुरवली. **(क्रमशः)**

# "आरक्षणाचे तुकडे की संपूर्ण हक्क? : आजच्या पिढीने विचार करण्याची वेळ"

ज्योतिर्मय साहित्य

आज आपण एका अत्यंत गंभीर आणि संवेदनशील टप्प्यावर उभे आहोत. अनुसूचित जाती (एससी) समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर 'अ, ब, क, ड' असे वर्गीकरण करण्याचा मुद्दा पुढे येत आहे. हा विषय केवळ प्रशासनिक बदल नाही, तर आपल्या सामाजिक न्यायाच्या लढ्याशी निगडित आहे. म्हणूनच या विषयाकडे भावनिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

आरक्षणाचा इतिहास आणि त्यामागील संघर्ष

भारतातील आरक्षण व्यवस्था ही कुठल्याही दयेची किंवा कृपेची देणगी नाही. ती हजारो वर्षांच्या सामाजिक अन्यायाविरुद्धच्या संघर्षातून मिळालेली ऐतिहासिक विजयाची निशाणी आहे.महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांनी शिक्षण, समानता आणि न्याय यासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या १०० वर्षांहून अधिक काळ चाललेल्या संघर्षातूनच एससी, एसटी आणि ओबीसी समाजाला शिक्षण, नोकरी आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा अधिकार मिळाला.

ही केवळ धोरणात्मक तरतूद नाही, तर संविधानिक हक्क आहे जो सामाजिक समतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

'अ, ब, क, ड' वर्गीकरण : न्याय की विभाजन?

आज '' समाजात वर्गीकरण करण्याचा प्रस्ताव पुढे येतो आहे. वरवर पाहता हा प्रस्ताव 'समाजातील सर्व घटकांपर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचावा' या उद्देशाने मांडला जातो. पण प्रश्न असा आहे हा निर्णय खरोखर सर्वांना न्याय देईल का? की हा एक हळूहळू आरक्षण कमकुवत करण्याचा डाव आहे? आजची वस्तुस्थिती पाहिली तर, साठी असलेले १३% आरक्षण पूर्णपणे भरले जात नाही. अनेक शासकीय विभागांमध्ये अनुशेष () कायम आहे. अनेक पदे रिक्त आहेत.

मग प्रश्न असा उभा राहतो जिथे पूर्ण आरक्षणही दिले जात नाही, तिथे वर्गीकरण करून न्याय मिळेल का?

अनुशेष आणि रिक्त पदांची वास्तवता

गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय नोकऱ्यांमध्ये एससी कोट्यातील पदे भरली जात नाहीत. अनेक

विभागांमध्ये हजारो पदे रिक्त आहेत

'योग्य उमेदवार नाही' या कारणावरून जागा खुल्या वर्गाला दिल्या जातात अनुशेष भरला जात नाही भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबवली जाते ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे.आरक्षण दिले आहे, पण त्याची अंमलबजावणी नाही हक्क आहे, पण त्याचा उपयोग नाही

अशा वेळी वर्गीकरणाचा मुद्दा पुढे येतो, जो मूळ प्रश्नांपासून लक्ष विचलित करतो.

कॉन्ट्रॅक्ट पद्धती : आरक्षणावरचा मोठा धोका

आज सरकारी नोकऱ्यांमध्ये कायमस्वरूपी भरती कमी होत आहे




आणि कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने भरती वाढत आहे.ही पद्धत अत्यंत धोकादायक आहे कारण कॉन्ट्रॅक्ट भरतीत आरक्षण लागू होत नाही, नोकरीची शाश्वती नाही

पदोन्नतीची संधी नाही, सामाजिक सुरक्षा नाही म्हणजेच, आरक्षणाचा मूळ उद्देशच नष्ट होतो आहे. जर हीच पद्धत वाढत राहिली, तर भविष्यात आरक्षण केवळ कागदावर उरेल.

पुढाऱ्यांची भूमिका : प्रश्न विचारण्याची वेळ

आज समाजात अनेक समाजाचे पुढारी आरक्षणाच्या नावावर राजकारण करत आहेत. आपल्या समाजातील आपल्याच तरुण बांधवांना गुमराह करत आहेत ही बाब योग्य नाही आज तरुण शिकलेला आहे तो वाचतो आहे तो लिहितो आहे बाबासाहेबांचे विचार घेऊन पुढे जात आहे. बाबासाहेब म्हणाले होते वाचाल तर वाचाल पण वास्तव काय आहे? अनेक पुढारी वाचन न करता तुकडे पाडण्याची भाषा करत आहेत ही बाब योग्य की अयोग्य? वेळीच ओळखायला हवे. आपल्यातील अनेक मोठे झालेल्या पुढाऱ्यांना आरक्षणाची गरज उरलेली दिसत नाही. पण आजही ग्रामीण भागामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना कोणत्या परिस्थितीमधून जावे लागते हे याच तरुणांना माहीत.

मग प्रश्न असा आहे नेतेमंडळी ते कोणासाठी लढत आहेत? सामान्य गरीब मुलांसाठी की स्वतःच्या स्वार्थासाठी? आज झोपडीत राहणारा विद्यार्थी, पालावर राहणारा मुलगा,ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुलगा याला खऱ्या अर्थाने आरक्षणाची गरज आहे.

त्याच्या शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि भविष्याकरिता आरक्षण हेच एकमेव साधन आहे. जर हेच आरक्षण विभागले गेले तर काय परिस्थिती निर्माण होईल याचा विचार करा. एससी ला एकूण १३% आरक्षण आहे.यामध्ये एकूण ५९ जाती आहेत.यामध्ये,बौद्ध लोकसंख्या ६०% आहे मांग लोकसंख्या १९% आहे. चांभार लोकसंख्या १०% आहे जवळपास. एससीमध्ये सगळ्यात मोठा वाटा फक्त या ३ जातीचा आहे.जवळपास ९२%. बाकी ५७ जाती फारच लहान आहेत. ०.५%, ०.२% अशी लोकसंख्या आहे. त्यामुळे त्या जाती कुठेच दिसत देखील नाहीत. ना शिक्षण ना शासकीय सेवेत. कारण शिक्षणाचा




अभाव. बाबासाहेब म्हणाले होते की शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा यासाठी त्यांनी म्हटले होते तुम्ही शिकलात तर तुमचा फायदा होईल.

तुकडे पडल्यास काय होऊ शकते

लोकसंख्या नुसार एससी च्या १३% आरक्षण मधून मांग जातीला – २.६% आरक्षण मिळेल.आता यात अजून वाटे पडतील अनेक जाती पोटजातीत विखुरल्या जातील वादविवाद होतील आणि भविष्यात तुकडे तुकडे पडतील परत एका छताखाली येतील का नाही हे सांगता येणार नाही.जर अ, ब, क,ड नुसार विभाजन झाले तर ज्या समाजात शिक्षणास कुणीहीपात्र नसल्यास ती जागा त्या आरक्षणाचा फायदा ओपन कॅटेगिरीतील व्यक्तीला होईल हे तुम्हाला समजायला हवे.

आज खऱ्या अर्थाने तरुण मंडळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन ५९ जाती मधील तरुण-तरुणी १३% मध्ये आपले भविष्य आजमावत आहेत. जर अजून यामध्ये तुकडे पडले तर काय परिस्थिती उद्भवेल याचा विचार करायला हवा.

आजच्या पिढीची जबाबदारी

आजची पिढी ही सर्वात महत्त्वाची आहे. आपण अंधपणे कोणाचाही पाठलाग करू नये कोणत्याही पुढाऱ्याच्या भावनिक भाषणांना बळी पडू नये प्रत्येक गोष्टीचा तर्कशुद्ध विचार करावा

आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा:,

आपल्याला संपूर्ण १३% आरक्षण हवे आहे का?

की त्याचे तुकडे करून कमी प्रभावी आरक्षण स्वीकारायचे आहे?

शिक्षण : खरा बदलाचा मार्ग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा."आजही हेच तत्व लागू आहे.शिक्षण हेच आपले सर्वात मोठे शस्त्र आहे जागरूकता हीच आपली ताकद आहे एकता हीच आपली ओळख आहे

जर आपण विभाजित झालो, तर आपली ताकद कमी होईल.

एकता की विघटन?

'अ, ब, क, ड' वर्गीकरणामुळे समाजात विभागणी होण्याची शक्यता आहे.एकाच समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होऊ शकतो. एकजूट कमी होईल. सामूहिक ताकद कमजोर होईल.

इतिहास सांगतो विभाजन हे नेहमीच शोषक शक्तींना फायद्याचे ठरते.

कवी संदेश कर्डक म्हणतात की, वज्रमुठीतलं हिंदुत्व अण्णा सुटता सुटना, अन अबकड आमचंच आम्हांला कळना, तू सांगितलं होतंस ना घाव घालून जग बदलायला,

आमचंच अण्णा अजून दैववादाचं साखळदंड तुटना, बाबासाहेब नावाच्या आभाळाखाली वावरताना

जातीच्या छत्र्या आमच्या अजून काही फाटना,

महार मांग एकाचं नाण्याच्या दोन बाजू कळता कळना,

एकाचं ताटातल्या भाकरीसाठी भाऊ भावाला वळखना, मनुच्या जात्यात फसला मांग त्याच त्यालाच समजना

गुलामीच्या चिखलात बसला ऐरावत, बाहेर पडता पडन पुढील दिशा : काय करावे?

आज आपण काही ठोस भूमिका घ्यायला हव्यात,अनुशेष भरावा यासाठी संविधानिक मार्गाने कायद्याच्या चौकटीतून आंदोलन करणे, रिक्त पदे तात्काळ भरली जावीत यासाठी दबाव निर्माण करणे,कॉन्ट्रॅक्ट पद्धतीला विरोध करणे आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करणे

समाजात एकता राखणे या बाबीवर लक्ष केंद्रित असायला हवे.

**(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559